www.rajdand.com
सातारा गुरूवार
१५. २. २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ !
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९

२५ वर्षे विश्वासार्हतेची

## महत्त्वाचे

### राष्ट्रवादी आमदारांच्या अपात्रता प्रकरणी आज विधानसभा अध्यक्ष देणार निकाल

**मुंबई** - निवडणूक आयोगाच्या निकालानंतरराष्ट्रवादी काँग्रेसपक्ष आणि चिन्ह उपमुख्यमंत्रीअजित पवारयांच्याकडे आल्यानंतर आता विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्याकडील राष्ट्रवादीच्या आमदार अपात्रतेवर उद्या गुरुवारी निर्णय होणार आहे. नार्वेकर सायंकाळी साडेचार वाजता निकालाचे वाचन करणार आहेत.-ऊत्तएठढखडएचएछढअजित पवारयांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादीचा एक गट राज्यातील युती सरकारमध्ये सामील झाला. त्यानंतर राष्ट्रवादीत अजित पवार गट आणिशरद पवारगट एकमेकांसमोर आले. दोन्ही गटांकडून एकमेकांविरोधात आमदार अपात्रता याचिका दाखल केल्या होत्या. या याचिकांवर नार्वेकरांसमोर सुनावणी झाली. साक्ष नोंदणी, उलटतपासणी आणि अंतिम युक्तिवादानंतर ३१ जानेवारी रोजी सुनावणीचे कामकाज संपले.केंद्रीय निवडणूक आयोगाने अलीकडेच अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील पक्षच मूळ राष्ट्रवादी असल्याचा निकाल दिला होता.

### रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्यास तत्त्वत: मान्यता

**कोल्हापूर :** ापालिकेतील ५२६ रोजंदारी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्यास मंत्रालयात मंगळवारी झालेल्या बैठकीत तत्त्वत: मान्यता देण्यात आली. रोजंदारी कर्मचाऱ्यांना कायम करण्याबाबत येणाऱ्या अडचणींपैकी प्रशासकीय खर्चाची ३५ टक्क्यांची अट तसेच वयोमर्यादेची अट शिथिल करण्यासंबंधीचा प्रस्ताव लवकरात लवकर पाठवावा, अशा सूचना महापालिका अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. पालकमंत्री हसन मुश्रीफ यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत मंत्रालयात बैठक झाली. यावेळी नगरविकास सचिव के. एच गोविंदराज वित्त विभागाचे सचिव, महापालिका प्रशासक के. मंजूलक्ष्मी, अतिरिक्त आयुक्त केशव जाधव, सहायक आयुक्त संजय सरनाईक, शहर अभियंता हर्षजित घाटगे, जलअभियंता नेत्रदीप सरनोबत, अमृत योजनेचे संचालक उपस्थित होते.

# घोडेबाजार टळला...!

## राज्यसभा निवडणूक बिनविरोध होणार, सहा जागा सहा उमेदवार



**तीन वर्षे बाकी असतानाही प्रफुल्ल पटेल यांना उमेदवारी**

**राज्यसभा सदस्य असलेले राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांना उमेदवारी देत पक्षाने धक्का दिला. पटेल यांचा सध्याचा राज्यसभा सदस्यत्वाचा कार्यकाळ मे २०२७ मध्ये संपणार आहे तरी त्यांना उमेदवारी देण्यात आली. कारण राष्ट्रवादीतील फुटीनंतर ते पक्षाचे असे एकटेच राज्यसभा सदस्य आहेत जे अजित पवारांसोबत आहेत. अन्य सदस्य शरद पवार यांच्यासोबत आहेत.**

**मुंबई** - महाराष्ट्र विधानसभेतून राज्यसभेवर पाठवावयाच्या सहा सदस्यांसाठीची निवडणूक बिनविरोध होणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे. भाजपने चौथा उमेदवार दिलेला नाही आणि महाविकास आघाडीने एकच उमेदवार दिला त्यामुळे निवडणूक बिनविरोध होण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

आता भाजपचे तीन, मित्र पक्षांचे प्रत्येकी एक याप्रमाणे सत्तारुढ महायुतीचे पाच आणि काँग्रेसचे एक असे सहा जण बिनविरोध निवडले जातील असे चित्र आहे. उमेदवारी अर्ज भरण्याचा आज (गुरुवार) शेवटचा दिवस आहे. अशोक चव्हाण यांनी मंगळवारी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर त्यांना लगेच राज्यसभेवर पाठविण्याचा निर्णय पक्षाने घेतला. मेधा कुलकर्णी या पुण्यातील माजी आमदार आहेत, तर डॉ. गोपछडे हे नांदेडचे असून संघाचे कट्टर कार्यकर्ते आहेत.

काँग्रेसने उमेदवारी दिलेले माजी सामाजिक न्यायमंत्री चंद्रकांत हंडोरे (मुंबई) यांचा जून २०२१ मधील विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचे अधिकृत उमेदवार असूनही पराभव झाला होता. आता त्यांना राज्यसभेची संधी देण्यात आली आहे. शिवसेनेचे (शिंदे गट) उमेदवार मिलिंद देवरा यांनी नुकताच काँग्रेसमधून शिवसेनेत प्रवेश केला होता. भाजपने चौथा उमेदवार न दिल्याने घोडेबाजार टळला आहे.

**कारण काय** - शरद पवार गटाने पटेल यांचे राज्यसभा सदस्यत्व रद्द करण्याची याचिका राज्यसभा सभापतींकडे केलेली आहे. उद्या त्याचा निकाल आला व पटेल यांचे सदस्यत्व रद्द झाले तर त्यांना खासदारकी गमवावी लागेल. हे लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला. बाबा सिद्दिकी, पार्थ पवार ही चर्चेतील नावे मागे पडली. तांत्रिक कारणांमुळे पटेल यांना उमेदवारी देत आहोत असे राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी स्पष्ट केले.

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून प्रफुल्ल पटेलांना पुन्हा राज्यसभेची उमेदवारी




### सुनील तटकरे यांची माहिती

भाजप, शिवसेना आणि काँग्रेसनंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसनेही आपला राज्यसभेचा उमेदवार जाहीर केला आहे. पक्षाने ज्येष्ठ नेतेप्रफुल्ल पटेल(झीर्षीश्र झरींशश्र) यांना पुन्हा एकदा राज्यसभेची उमेदवारी दिली आहे. प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली आहे. विशेष म्हणजे,प्रफुल्ल पटेलांचाराज्यसभेचा बराच कार्यकाळ शिल्लक आहे. त्यामुळे पक्षाच्या या निर्णयाने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.-ऊत्तएठढखडएचएछढमहाराष्ट्रातील राज्यसभेच्या ६ जागांसाठीनिवडणूकहोणार आहे. यातील तीन जागा भाजपला मिळणार आहेत, तर शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादीला प्रत्येकी एक जागा मिळणार आहे. इतर तीन पक्षांनी यापूर्वीच आपले उमेदवार जाहीर केले होते. त्यामुळेअजित पवारगटाकडून कुणाला संधी दिली जाणार? याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात होते. आता अखेर पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेलांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, प्रफुल्ल पटेल निवडून आल्यानंतर आपल्या आधीच्या सदस्यपदाचा राजीनामा देतील. त्यानंतर मे महिन्यात पटेलांच्या आधीच्या टर्मसाठी पोटनिवडणूकहोईल, अशी माहिती सुनील तटकरे यांनी दिली आहे. दरम्यान, या पदासाठी पक्षातून अनेकजण इच्छूक होते. इतर कुणाला उमेदवारी दिली असती, तर पक्षात नाराजी पसरण्याची शक्यता होती, त्यामुळेच हा असा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.महायुतीकडून आतापर्यंत राज्यसभेच्या ६ पैकी ५ जागांसाठी उमेदवार जाहीर करण्यात आला आहे. सहाव्या जागेबाबतचा सस्पेन्स कायम आहे. सहाव्या जागेवर निवडणूक लढवण्यास तयार असल्याचे संकेत महायुतीच्या नेत्यांनी आधीच दिले आहेत. त्यामुळे महायुतीने सहाव्या जागेसाठी खरंच उमेदवार दिला तर लढत चुरशीची होईल. राष्ट्रवादीकडूनअजित पवारयांचे चिरंजीव पार्थ पवार यांच्या नावाची जोरदार चर्चा होती. तसेच बाबा सिद्दीकी यांच्या देखील नावाची चर्चा होती. पण प्रफुल्ल पटेल यांनाच पुन्हा संधी देण्यात आली आहे.भाजप आणि शिवसेन आणि काँग्रेसचे उमेदवार जाहीर

राज्यसभेसाठी भाजपाकडून महाराष्ट्रातील उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली. भाजपाने आपल्या पक्षाकडून अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी आणि डॉ. अजीत गोपछडे यांना राज्यसभेचे तिकीट दिले. तर शिवसेना शिंदे गटाकडून मिलिंद देवरा यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. काँग्रेसकडून चंद्रकांत हंडोरे राज्यसभेवर जाणार आहेत.

## राज्यातील पहिले ‘सेफ हाऊस’ सातारा जिल्ह्यात

### आंतरजातीय, आंतरधर्मीय जोडप्यांसाठी व्हॅलेंटाइन दिनी सुरुवात



**सातारा :** जातीधर्माच्या नावावर स्वत:च्या कुटुंबातील मुला-मुलींचा जोडीदार निवडण्याच्या हक्क डावलला जाण्याच्या घटना आपल्या आजूबाजूला सर्रास घडत असतात. या पार्श्वभूमीवर आंतरजातीय आणि आंतरधर्मीय जोडप्यांनालग्नानंतरसुरुवातीच्या कालखंडात सुरक्षित निवारा देणारे महाराष्ट्रातील पहिले सेफ हाऊस सातारा जिल्ह्यात सुरू करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र अंनिसमार्फत डॉ. हमीद दाभोलकर आणि शंकर कणसे यांनी दिली आहे.

पत्रकात नमूद केले आहे की, गेली अनेक वर्षे महाराष्ट्र अंनिस आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहांना पाठबळ देण्याचे काम करत आहे. यामध्ये घरच्या लोकांनी टोकाची भूमिका घेतल्यामुळे अनेक जोडप्यांना सुरुवातीच्या कालखंडात त्यांच्या गावी लगेच जाता येत नाही, तसेच कुटुंबीय आणि समाजाकडून मारहाणीचा, तसेच जिवाचादेखील धोका उद्भवू शकतो, अशा परिस्थितीत त्या जोडप्याला सुरक्षित निवारा देणाऱ्या केंद्राची गरज म्हणून याची उभारणी करण्यात आली आहे. पंजाब, हरयाणासारख्या राज्यांमध्ये राज्य शासनाच्या मदतीने अशी सेफ हाऊस चालवली जातात. याच स्वरूपाचे पहिले सेफ हाऊस सातारा जिल्ह्यात सुरू करण्यात आले आहे.-ऊत्तएठढखडएचएछढ-वी लूशासन निर्णयामुळे मिळाले बळ!

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जानेवारी महिन्यात महाराष्ट्र शासनाच्या गृहविभागाने आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाह केलेल्या जोडप्यांना संरक्षण देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये जिल्हा पोलिस अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करावी, या समितीमार्फत त्यांच्याकडे मदत मागणाऱ्या जोडप्यांना सुरक्षा पुरवण्यात यावी. प्रत्येक जिल्ह्यात अशा जोडप्यांना सुरक्षा निवारा केंद्र उपलब्ध करून द्यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत. या शासन निर्णयामुळे महाअंनिससारख्या सुरक्षा निवारा केंद्र चालवणाऱ्या संस्थेला मोठे बळ मिळणार आहे.जोडप्यांच्या आधारासाठी अंनिस खंबीर जात ही एक कुठलाही आधार नसलेली अंधश्रद्धा आहे, या डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या भूमिकेला अनुसरून हे केंद्र सुरू केले आहे. आंतरजातीय विवाहांच्या माध्यमातून जाती निर्मूलनाचे प्रयत्न करण्याचा हा एक प्रयत्न असल्याचेदेखील यामध्ये नमूद केले आहे. महाराष्ट्र अंनिसमार्फत आज अखेर लावण्यात आलेल्या आंतरजातीय आणि आंतर धर्मीयलग्नामधीलजोडप्यांमधील काही लोक या कामी महाअंनिसची मदत करणार आहेत. आंतरजातीय, आंतरधर्मीय लग्न केलेल्या जोडप्यांना येणाऱ्या त्रासाला सामोरे जाण्यासाठी त्यांना मदत मिळावी म्हणून अंनिसमार्फत एक आधार गटदेखील चालू करण्यात आला आहे.असे सुरू होणार काम

आंतरजातीय आणि आंतरधर्मीय लग्न सहायता केंद्र चालवताना अंनिसमार्फत त्या मुला-मुलींची सविस्तर मुलाखत घेऊन त्यांच्याशी संवाद साधला जातो आणि त्यानंतर पोलिसांची मदत घेऊन त्यांचे लग्न लावण्यास मदत करणे आणि गरज पडल्यास त्यांना सुरक्षित निवारा पुरवणे, हे काम केले जाते.

हे सुरक्षा निवारा केंद्र पूर्ण मोफत चालवले जाते आणि आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह सहायता केंद्राची मदत हवी असल्यास त्यासाठी महाराष्ट्र अंनिसमार्फत ९९२२३५५४३५ ही मोफत हेल्पलाइनदेखील चालवली जाते, असेदेखील या पत्रकात नमूद केले आहे.

महाराष्ट्र अंनिसचे कार्यकर्ते शंकर कणसे यांच्या जागेत त्यांनी स्वखर्चातून हा सुरक्षा निवारा बांधला आहे आणि महाराष्ट्र अंनिस आणि स्नेह आधार संस्थेमार्फत हा उपक्रम चालवला जाणार आहे. या निवारा केंद्रामुळे आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना सुरक्षित निवारा देण्याची व्यवस्था होणार आहे.

## पत्रकारांच्या ऐक्यामुळे पत्रकार भवन साकारले : खा.उदयनराजे भोसले

**सातारा :** जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष हरीश पाटणे आणि त्यांची टीम ऐक्यभावनेने काम करीत आहेत.त्यांनी पाठपुरावा केल्याने पत्रकार भवन साकारले असल्याचे गौरवोद्गार खा. उदयनराजे भोसले यांनी काढले.

येथील गोडोली येथे जिल्हा पत्रकार भवन उद्घाटन सोहोळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. तेव्हा खा.श्रीमंत छ.उदयनराजे भोसले मार्गदर्शन करीत होते. प्रथमतः मराठी पत्रकार परिषद मुंबईचे एस. एम. देशमुख यांच्या हस्ते फीत कापून औपचारिक उद्घाटन करण्यात आले.यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी , पोलीस अधीक्षक समीर शेख , प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, डिजिटल मीडिया सर्व पदाधिकारी सदस्य यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.खा.



**जिल्हा पत्रकार भवनचे फीत कापुन उद्घाटन करताना एस.एम.देशमुख शेजारी खा. भोसले व मान्यवर.(छाया-अनिल वीर)**

भोसले म्हणाले, जिल्हाध्यक्ष हरिष पाटणे यांना राजीनामा देण्यापासून परावृत्त करू. कारण,त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात पत्रकार चांगले काम करीत आहेत.भवनाचा प्रश्न मिटल्याने अजुनही अनेक विकासाची कामे पत्रकारांच्या सहकार्याने करावयाची आहेत.

यावेळी ॲड.बनकर,देशमुख आदी मान्यवरासह हरीश पाटणे यांनी अभ्यासपूर्ण व तडाखेबाज भाषणे करून लेक्ह्यूचे सभागृह खेळवून ठेवले होते. शहराध्यक्ष विनोद कुलकर्णी यांनी प्रास्ताविकपर आढावा घेऊन जिल्हाध्यक्ष यांची गरज यापुढेही राहील.असे स्पष्ट करून राजीनामा नाट्यावर पडदा टाकला.यावेळी जिल्ह्यातील सर्व संघटनांचे पदाधिकारी,संपादक, पत्रकार मोठ्या संख्येनी उपस्थित होते.समारोप्रसंगी मिष्टान्न भोजनांचा आनंद उपस्थित पत्रकारासह अन्य मान्यवरांनी घेतला.

## आंबेगाव तालुक्यात भूजल पातळीत सरासरी दोन ते तीन फुटांनी घट

### पुनर्भरण योजना राबविणे गरजेचे

**रांजणी :** आंबेगाव तालुक्यात गेल्या काही वर्षात दिवसेंदिवस भूजल पातळीत घट होत चालली आहे .त्याकरिता खास करून पुनर्भरण योजना सुरू करणे गरजेचे आहे . उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून त्याचे व्यवस्थापन केले नाही तर भविष्यात तालुक्यातील जनतेला मोठ्या पाणीटंचाईचा सामना करावा लागेल .दरम्यान पाणीटंचाईवर मात करण्यासाठी भूजल पुनर्भरण योजना सुरू करणे काळाची गरज आहे . उपलब्ध पाण्याचे योग्य नियोजन करून त्याचे व्यवस्थापन करणे देखील तितकेच महत्वाचे आहे . पाणलोट क्षेत्रात झालेल्या पर्जन्यमानानुसार भूजल पातळीत वाढ होते . पावसाळ्यानंतर भुजलाच्या वापरानुसार हा भूजल संचय कमी होतो . परिणामी पाण्याच्या पातळीत घट होत असल्याचे भुजल विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले . अपुरा पाऊस ,परतीच्या पावसाने फिरवलेली पाठ आणि पाण्याचा वाढता उपसा यामुळे तालुक्यात भूजल पातळीत सरासरी दोन ते तीन फुटांनी घट झाल्याचे निदर्शनास आले आहे .

भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेने केलेल्या तालुक्यातील पाणी पातळीत मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे निदर्शनास झाले आहे . पुरंदर तालुक्यात सर्वाधिक पाणी पातळी खोल गेल्याचे देखील भूजल सर्वेक्षण यंत्रणेमार्फत सांगण्यात आले .या दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या नोंदीतून प्रत्येक तालुक्यातील भूजल पातळीत झालेली वाढ तसेच घट समजते . भूजल पातळीचा अभ्यास करण्याकरता प्रत्येक पाणलोट क्षेत्रात तीन निरीक्षण विहिरी याप्रमाणे जिल्ह्यात १९२ निरीक्षण विहिरी निश्चित केल्या आहेत . त्यात ७१ कुपनलिकांचा समावेश आहे .यातील पाण्याचा उपसा केला जात नाही . पाणलोट क्षेत्रानुसार भूजल नोंदणीची ठिकाणे ठरवली जातात .भूजल विभागाने जानेवारी महिन्यात घेतलेल्या नोंदीचा अभ्यास करून त्याचा अहवाल नुकताच प्रसिद्ध केले आहे . त्यामध्ये आंबेगाव तालुक्यात भूजल पातळीत घट झाल्याचे दिसून आले आहे .पाच वर्षांपूर्वी जानेवारीत भूजल पातळी ११.७७ कोटी इतकी होती .यंदा मात्र पाच वर्षाच्या तुलनेत तालुक्यात दोन ते अडीच फुटांनी पाणी पातळी खोल गेल्याचे चित्र पाहायला मिळते .इतर तालुक्यांच्या तुलनेत आंबेगाव तालुक्यात पाणी पातळी फारशी खोलवर गेली नसल्याचेही भूजल सर्वेक्षणातून सांगण्यात आले . आंबेगाव तालुका हा सुजलम सुफलाम आहे . तालुक्याला डिंभे धरणाचे वरदान मिळाल्यामुळे धरणातून उन्हाळ्यात आवर्तन सोडले जाते. त्यामुळे साहजिकच कोरड्या ठणठण पडलेल्या विहिरींना देखील पाणी मिळते . त्यातच तालुक्यात पुनर्भरणाच्या योजना देखील बऱ्यापैकी राबवल्या जात असल्याने इतर तालुक्यांच्या तुलनेत आंबेगाव तालुक्यात शेतकऱ्यांना पाणीटंचाईचा कमी प्रमाणात सामना करावा लागतो असे कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी वळती गावचे सामाजिक कार्यकर्ते महादेव भोर यांनी सांगितले .

# निवडणुकीच्या तोंडावर अशोक चव्हाणांचे पक्षांतर काँग्रेसला नाउमेद करणारे

नांदेड ते दिल्लीची वळणे, दशकानुदशके काँग्रेसचेच म्हणून ओळखले जाणारे आणि आता उजवा रस्ता धरणारे चव्हाण हे दुसरे घराणे. आधी मुंबईत मिलिंद देवरा यांनी पक्ष सोडला निवडणुकीच्या तोंडावर अशोक चव्हाणांचे पक्षांतर काँग्रेसला नाउमेद करणारे. काल-आज महाराष्ट्राचे, देशाचे राजकारण नव्या वळणावर पोहोचले आहे. लोकसभेतील सलग पंचवीस वर्षांची कारकीर्द थांबवूनकाँग्रेसच्याज्येष्ठ नेत्या श्रीमती सोनिया गांधी राज्यसभेच्या वाटेवर आहेत. त्यांचा राजस्थानमधून अर्ज हे महत्त्वाचे राजकीय वळण आहे. पती राजीव यांच्या हत्येनंतर आठ वर्षांनी सोनिया राजकारणात आल्या. राजीव यांच्या अमेठी मतदारसंघातून त्यांनी लोकसभेत प्रवेश केला. नंतर सासू इंदिरा व सासरे फिरोज गांधी यांच्या रायबरेलीचे त्या प्रतिनिधित्व करू लागल्या. आता त्या राज्यसभेत जाताहेत. उल्लेखनीय म्हणजे त्यांच्यासोबत जया बच्चन, सुष्मिता देव, सागरिका घोष, मेधा कुलकर्णी, ममताबाला ठाकूर, माया नरोलिया यादेखील राज्यसभेचा उंबरठा ओलांडू पाहत आहेत. राजकारणाचे दुसरे वळण महाराष्ट्रात व तेदेखीलकाँग्रेसशीसंबंधित आहे.-उ्तएठढखडएचएछढमाजी मुख्यमंत्रीअशोक चव्हाणयांचा पक्ष व आमदारकीचा राजीनामा, चोवीस तासांत भारतीय जनता पक्षात प्रवेश, लगोलग राज्यसभेची उमेदवारी या घडामोडींनी पुन्हा राज्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. काँग्रेस पक्षाशी स्वत:ची चाळीस तर चव्हाण कुटुंबाची सत्तर वर्षांची नाळ का तोडली वगैरेबद्दल आपण काही बोलणार नाही, असे स्वत:अशोक चव्हाणांनीचसांगितल्याने पक्षाचे प्रदेश प्रभारी रमेश चेन्नीथला किंवा इतरांनी कितीही संताप व्यक्त केला तर पुढे काही होणार नाही. अर्थात रविवारी सायंकाळपर्यंत पक्ष तसेच महाविकास आघाडीच्या बैठकांमध्ये व्यस्त असणारे, डिसेंबरमध्ये नागपूर येथे झालेल्या स्थापना दिनाच्या सभेची जबाबदारी उचलणारे, भारत जोडो यात्रा यशस्वी करणारे, सध्याच्या भारत



जोडो न्याय यात्रेची समरसून तयारी करणारे अशोक चव्हाण अचानक पक्ष सोडतात हे सर्वांसाठीच धक्कादायक होते. त्यातही शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसची शकले पडत असताना अभेद्य राहिलेल्या, त्याचा तोरा मिरविणाऱ्या काँग्रेससाठी लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर हे पक्षांतर नाउमेद करणारे आहे.दशकानुदशके काँग्रेसचेच म्हणून ओळखले जाणारे आणि आता उजवा रस्ता धरणारे चव्हाण हे दुसरे घराणे. आधी मुंबईत मिलिंद देवरा यांनी पक्ष सोडला आणि एकनाथ शिंदे यांची शिवसेना जवळ केली. दिवंगत मुरली देवरा तसेच मिलिंद यांनी केंद्रात मंत्रिपदे सांभाळलेली. मिलिंद हा राहुल गांधींच्या यंग ब्रिगेडचा एक चेहरा. त्या पक्षांतराची शाई वाळण्याआधीच अशोक चव्हाण यांनी स्फोट घडविला. भूषविलेल्या पदांचा विचार केला तर नांदेडचे चव्हाण घराणे देवरा यांच्यापेक्षा काकणभर सरस. मराठवाड्याचे पाणीदार नेतृत्व, दिवंगत शंकरराव चव्हाण यांच्याप्रमाणेच अशोक चव्हाण यांनीही दोनवेळा राज्याचे मुख्यमंत्रिपद भूषविले. शंकरराव चव्हाण यांनीही एकदा वेगळी वाट धरली होती. पण, ती इंदिरा गांधींच्याच इशाऱ्यावर. अशोकरावांसारखी त्यांनी काँग्रेसच्या मूळ प्रवाहापासून फारकत घेतली नव्हती.दरम्यान, मुंबईतील काँग्रेसचे बडे नेते बाबा सिद्दीकी यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश घेतला. देवरा, सिद्दीकी, चव्हाण ही सगळी जुळवाजुळव लोकसभा निवडणुकीसाठी दिल्लीतून आणि तीदेखील 'साम, दाम, दंड, भेद' या परिचित नीतीनुसार सुरू आहे, यात शंका नाही. लागोपाठचे सर्व्हे दाखवतात की लोकसभेच्या जागांबाबत देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असलेल्या महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे मोठे आव्हान भाजपपुढे आहे. छत्रपती शिवरायांचे नाव आणि मराठा चेहरा ते आव्हान पेलण्यासाठी आवश्यक आहे. त्यासाठीच सुरुवातीला नारायण राणे, राधाकृष्ण विखे-पाटील यांना भाजपने जवळ केले. ते पुरेसे नाही हे पाहून शिवसेना व राष्ट्रवादीला भगदाड पाडले आणि एकनाथ शिंदे, अजित पवार यांना सोबत घेतले, तरीही राणे वगळता इतर नेते राज्यापुरतेच मर्यादित आहेत आणि दिल्ली दरबारी काही उपयोग होत नाही हे स्पष्ट झाले तेव्हा, लघु-मध्यम-सूक्ष्म उद्योगमंत्री म्हणून सपशेल अपयशी ठरलेले नारायण राणे यांचा राज्यसभेचा कार्यकाळ संपुष्टात येत असताना अशोक चव्हाण यांच्या रूपाने उच्चविद्याविभूषित कुशल प्रशासक नेता भाजपने आपल्या तंबूत आणला. चव्हाण यांच्यासोबत भाजपने चंद्रकांत पाटील यांच्यासाठी कोथरूड मतदारसंघ सोडणाऱ्या मेधा कुलकर्णी व नांदेडचेच डॉ. अजित गोपछडे यांना उमेदवारी दिली आहे. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने मिलिंद देवरा, तर काँग्रेसने चंद्रकांत हंडोरे यांना रिंगणात उतरविले आहे. अजित पवार गटाने प्रफुल्ल पटेल यांनाच पुन्हा राज्यसभेवर पाठवायचे ठरवल्याने महाराष्ट्रातील निवडणूक बिनविरोध होईल. या घडामोडींचा तातडीचा अन्वयार्थ हाच, की नारायण राणे यांच्याऐवजी भाजपला अशोक चव्हाण अधिक महत्त्वाचे वाटतात.

## रस्ते अपघात टाळण्यासाठी नियमांचे पालन करणे जरुरीचे : दत्तात्रय गाढवे

### रस्ते सप्ताह निमित्त पुरोगामी विद्यालयात वाहतूक नियम जनजागृती

**हडपसर** : रस्त्यावरील अपघात टाळण्यासाठी काटेकोरपणे नियमांचे पालन केल्यास अपघात टळू शकतात, प्रत्येकाने रस्त्यावर वाहान चालवताना आरटीओने घालून दिलेले नियम पाळले पाहिजे तरच आपण सुरक्षित राहु आणि दुसरे ही सुरक्षित राहिले पाहिजे असे मत दत्तात्रय गाढवे प्रादेशिक परिवहन पुणे यांनी पुरोगामी विद्यालयात वाहतूक रस्ता सुरक्षा सप्ताह शिबिर आयोजित करण्यात आले होते यावेळी विद्यार्थांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

शिबीराचे आयोजन आरव मोटार ड्राव्हिंग स्कूलच्या वतीने करण्यात आले होते.

पुढे गाढवे म्हणाले की ,वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे अत्यावश्यक आहे. नागरिकांनी सीट बेल्ट, हेल्मेट आणि इतर सुरक्षा साधनांचा वापरास प्रोत्साहन दिल्यास अपघातास आळा बसू शकतो. अपघात झाल्यानंतर जखमींना मदत केले पाहिजे, अपणातानंतर बघ्याची भूमिका



घेऊ नका, वाहन चालवताना मोबाइलचा वापर टाळा, शारीरिक व मानसिक स्थिती बरोबर असेल तत्व वाहन चालविले पाहिजे. रस्ता सुरक्षा कार्यक्रमा अंतर्गत आरव मोटर ड्रायविंग स्कूल कुंजिरवाडी सहकार्याने पुरोगामी माध्यमिक विद्यालय प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे .संजीव भोर यांच्या मार्गदर्शनाखाली रस्ता सुरक्षा कार्यक्रमा अंतर्गत उपस्थित शालेय विद्यार्थी यांना

स्कूल बस मधून प्रवास करताना घ्यावयाची काळजी,

रस्ता ओलांडताना घ्यावयाची दक्षता,

रस्त्यावरून चालताना रस्त्याच्या उजव्या बाजूने चालावे,

पादचारी मार्ग व झेब्रा क्रॉसिंग वापरणे,हेल्मेटचे महत्त्व,सीटबेल्ट चे महत्व,रस्ता वाहतुकीचे नियम पाळणे,वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळावा,

१८ वर्षांपेक्षा कमी वय असणाऱ्या व्यक्तीने वाहन चालवले तर कायद्यातील शिक्षेची तरतूद असे विविध नियम पटवून दिले.याप्रसंगी आरव स्कूलचे राजू गायकवाड,मुख्याध्यापक एम.डी.जाधव,पर्यवेक्षक आर.एम. चव्हाण,विद्यार्थी,

शाळेचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## हडपसरमध्ये के.पी.पलूसकर पॅरामेडिकल इन्स्टिट्यूट पोस्टर स्पर्धा संपन्न

**हडपसर** : हडपसर मधील डॉ. के. टी. पलूसकर चॅरिटेबल ट्रस्ट के. पी. पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटच्या संयुक्त विद्यमाने पोस्टर प्रेझेंटेशन आणि मायक्रोट्यूब्स ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. शिवजयंती महोत्सव सप्ताहानिमित्त ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

स्पर्धेमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेत स्वकष्टाने बनवलेल्या मॉडेल्सचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू ही संकल्पना घेऊन हे मॉडेल्स बनवण्यात आले होते. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात पोस्टर स्पर्धा कार्यक्रम पार पडली. विद्यार्थ्यांनी मेडिकल क्षेत्रातील विविध लागणारे स्टूल, तसेच मानवी शरीराच्या विविध अवयवयांचे चित्रांच्या , पोस्टरच्या माध्यमातून कलांचे दर्शन घडविले.

या कार्यक्रमास या दिवसासाठी विद्यार्थी पांढऱ्या आणि काळ्या रंगाचे कपडे परिधान करून आल्याने कार्यक्रमाच्या वैभवात भर पडत विद्यार्थी उत्साही दिसत होते.

विद्यार्थ्यांना कलागुणांना वाव देण्यासाठी के.पी. पॅरामेडिकल इन्स्टिट्यूटचे संस्थापक अध्यक्ष कृपाल पलूसकर यांनी उपस्थित राहात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.यावेळी विद्यार्थी ,कर्मचारी उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक ड.कृपाल पलूसकर, प्रा. कोमल पलूसकर, प्राचार्य तबीना शेख, प्रा. पुजा इंगरे, प्रा. संदीप मेमाणे, प्रा. किरण कुंभार, आणि डिएमलटीचे विध्यार्थी उपस्तिथ होते.



## जातीच्या दाखल्यासाठीची ५० वर्ष पुराव्याची अट रद्द करण्यात यावी : महेंद्र कांबळे

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे पन्नास वर्ष पुरावा अट शिथिल करण्यासाठी महेंद्र कांबळे यांचे निवेदन



**जातीचे दाखले मिळविण्याठी जो कोणी खोटे पुरावे बोगस दाखले देऊन सर्टिफिकेट मिळवले आणि ते शासनाच्या निदर्शनास आले तर त्या व्यक्तीला दहा वर्षाची कारावास शिक्षा झाली पाहिजे यासाठी कायदा करावा, बोगस दाखले घेणा-यांना चाप बसेल , आणि सगेसोयरे यांचे जातीचे प्रमाणपत्र असल्यास तो जातीचा पुरावा समजला जावा, आज अनुसूचित जाती,जमातीकडे पन्नास वर्षा पूर्वीचे पुरावे नाहीत , ते शासनाच्या विविध योजनांपासून वंचित आहेत, शिक्षणात, नौकरी, अन्य कामासाठी जातप्रमाणपत्र नसल्याने मागासवर्गीय समाज वंचित आहे.पन्नास वर्ष पुरावा अट शिथिल करून जातीचे दाखले द्यायला हवे .**

**- महेंद्र कांबळे**

**माजी शहर अध्यक्ष रिपाइं पुणे**

**हडपसर** : राज्यामध्ये सध्या आरक्षणाचा मुद्दा गाजत आहे. मराठा, ओबीसी ,धनगर ,मुस्लिम ,ब्राह्मण अशा सर्वच घटकांना आरक्षण देण्याचा घाट शासनाकडून केला जात आहे निवडणुकीच्या तोंडावर आरक्षण हा कळीचा प्रश्न ठरत आहे.

आरक्षण संविधानात येते अथवा नाही परंतु आरक्षण देण्याचे राज्य शासन घोषित करत आहे , कायदेशीर संविधानाने अनु.जतिकरिता ५९ जातींना १३% आरक्षण दिले असताना त्यांना याचा लाभ मिळावा याकरिता कोणत्याही अनु.जातीतील नेत्यानी पुढाकार घेताना कुठेच दिसत नाही सर्वच घटकांना वाऱ्यावर सोडण्यात आले आहे आरक्षणाचा लाभ मिळवण्यासाठी जातीचा दाखल्याची गरज असते परंतु हा दाखला मिळवण्याकरिता १९५० च्या पुराव्याची अट टाकण्यात आली आहे त्यामुळे त्या वेळेसचे पुरावे अनेक समाज बांधवांकडे नाहीत, शिक्षण न झाल्यामुळे व गावाला काहीना जमीनच नसल्यामुळे कोणताही पुरावा जोडू शकत नसल्यामुळे जातीच्या दाखल्या पासून त्यांना वंचित व्हावे लागत आहे. जर दाखलाच मिळत नसेल तर आरक्षणाचा त्यांना काहीही फायदा होत नाही त्यामुळे अनु. जातीच्या दाखल्यासाठी सन १९५० च्या पुराव्याची अट त्वरित रद्द करावी किंवा ही अट त्वरित शिथिल करावी अशी मागणी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे ईमेलद्वारे पक्षाचे माजी शहराध्यक्ष महेंद्र कांबळे यांनी केले आहे,तसेच राज्यातील सर्व जातीची जातीनिहाय जनगणना करावी त्यामुळे कोणत्या जातीची किती लोकसंख्या आहे ते कळणार आहे भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी लाखो अनुयायी यांच्या समवेत बुद्ध धम्माची दीक्षा घेतली परंतु समाजामध्ये बौद्ध , नव बौद्ध, हिंदू महार असा तिहेरी उल्लेख केला जातो त्यामुळे बौद्ध , नव बौद्ध हिंदू महार यांचा नव बौद्ध असाच उल्लेख केला जावा असे आवाहन माजी शहराध्यक्ष महेंद्र कांबळे यांनी व्यक्त केला आहे.

## कोयना धरणग्रस्तांच्या प्रश्नांवर पुर्नवसन मंत्र्यासोबत सकारात्मक बैठक

### डॉ. भारत पाटणकर यांची पत्रकार परिषदेत माहिती

**पाटण** : कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत काल मंत्रालयात बैठक पार पडली. यावेळी पुनर्वसनाची प्रक्रिया वेगवान करून १०० टक्के काम पूर्ण करुन नजीकच्या महिन्यात पूर्णतः पुनर्वसन करणे व इतर विभागांच्या अखत्यारीत येणारे विषय मार्गी लावण्याबाबत चर्चा करण्यात आली असल्याची माहिती श्रमिक मुक्ती दलाचे अध्यक्ष डॉ भारत पाटणकर यांनी पाटण येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली .

या बैठकीस पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत फुलकुंडवार, पुनर्वसन विभागाचे उप सचिव डॉ . श्रीनिवास कोतवाल, ऊर्जा विभागाचे अधिकारी, सातारा, सांगली, सोलापुर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे,पालघर या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी अपर जिल्हाधिकारी, मुख्य वनसंरक्षक कोल्हापूर यांच्यासह संबधित विभागाचे अधिकारी दूरदुश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

बैठकीच्या सुरवातीसच हाय कोर्टात केस चालू आहे त्यावर कोयना धरणग्रस्तांना जमीन वाटपास बंदी आहे का असा प्रश्न केला त्यावर कोर्टाने अशी बंदी घातली नसल्याचे मंत्री महोद्यांनी सांगितले ची माहिती पाटणकर यांनी दिली ,

डॉ. पाटणकर पुढे म्हणाले

**कोयनेत झालेल्या धरणग्रस्तांच्या आंदोलनास भेट देऊन पालकमंत्र्यांनी महिन्यात बैठक घेऊ असे लेखी आश्वासन दिले होते त्याचे काय झाले, असे प्रश्न केला होता.**

**त्यावर पालकमंत्र्यांनी स्टेटमेंट दिले होते कि कोयना धरणग्रस्तांचा पुर्नवसनाचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, हाय कोर्टाने बंदी घातली आहे, यामुळे विलंब होतोय, मात्र परवाच्या मिटींगमध्ये असे काही बंदी घातली नसल्याचे स्पष्ट झाले आहे असे डॉ भारत पाटणकर यांनी सांगितले,**

आधी २०१८ ला तात्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, व नंतर अजित पवार यांच्या सोबत बैठक झाली होती,कोयना धरणग्रस्तांना कोयनेच्या लाभक्षेत्रातील जमीनी द्याव्यात अशी मागणी होती, तसेच खानापूर, कडेगाव तालुक्यातील वांग-मराठवाडी धरणग्रस्तांना वाटून शिल्लक राहिलेली जमीन कोयना धरणग्रस्तांना द्यावी अशी मागणी होती, त्यावर सकारात्मक निर्णय झाला होता. सुमारे ४७६ हेक्टर शिल्लक जमीन क्षेत्रात कोयना धरणग्रस्तांचे पुर्नवसन करावे,

सांगली जिल्ह्यात ४०० हेक्टर जमीन क्षेत्र आहे यामधे भागत आहे, हया जमीनी वाटपासाठी राखीव कराव्यात, महाराष्ट्रात सर्वच धरणग्रस्तांना वाटून शिल्लक जमीन धरणग्रस्तांना वाटपासाठी खुल्या कराव्यात, असा नियोजन आराखडा केला,

ज्या धरणांना १९७६ चा कायदा लागू नाही, त्यांना व त्यांच्या नंतर शेजारच्या जिल्ह्यातील धरणग्रस्तांना संधी दिली पाहिजे, यामधे कोयना बसत होते, यामध्ये अर्ज करायचे असे ठरून अर्ज केले, जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने जमीनी पसंती केली , ४५ दिवसांत इतर कोणी अर्ज नाही केला तर मुळ अर्जदारास जमीन वाटप केली पाहिजे, असा नियम असताना ३२० दिवस झाले मात्र आजूनही वाटप का केले जात नाही. असा सवाल डॉ. भारत पाटणकर यांनी यावेळी बोलताना केला, तर सांगली जिल्ह्यात ४१२ तर सातारा जिल्ह्यात ५३८ खातेदारांनी जमिनीसाठी आर्ज केले आहेत, जिल्हाधिकारी यांनी खातेदारांची पात्रता तपासून पात्र अर्ज मंत्रालयात पाठवून द्यायचे असे सांगितले आहे, आहवाल आल्यानंतर आवश्यक कार्यवाही १५ दिवसांत पूर्ण करून जमीन वाटप केले जाईल असा निर्णय बैठकीत झाला असल्याचे डॉ. पाटणकर यांनी सांगितले,

**आंदोलनाची दिशा व पुढील लढा याचे नियोजन करण्यासाठी गुरुवार ता. १५ रोजी सकाळी ११ वा. कोयनानगर येथील बाजार पटांगण शेजारी सर्व कोयना धरणग्रस्त स्त्री पुरुषांचा मेळावा आयोजित केला आहे. पत्रकार परिषदेस संतोष गोटल, हरिश्चंद्र दळवी, महेश शेलार, सचिन कदम, राम कदम, सीताराम पवार, पी. डी. लाड, श्रीपती माने, तानाजी बेबले, पवार गुरुजी, इत्यादी प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.**

बाकी अंशत वगैरे अर्जदारांची प्रकिया सुरू राहणार आहे, पसंतीनुसार जमीन वाटप करून गावठाणांचा आराखडा तयार करा असे निर्देश मंत्री पाटील यांनी बैठकीत दिले असल्याचे सांगितले. जनवन समितीत स्थानिक नागरिकांचा समावेश करून त्यांनीच आराखडा बनवला पाहिजे, एनजीओंचा सबंध काय? समितीत त्यांच्या वर आव्वाच्या सव्वा खर्च होतो, अशी अवस्था झाली आहे.

स्थानिकांच्या डावलून पर्यटनाचा सांगाडा उभा केला, ते पर्यटन स्थानिकांच्या ताब्यात द्यावे असा निर्णय घेण्यात आला, पर्यटन हे प्रकल्प ग्रस्तांच्या ताब्यात पाहिजे, मच्छीमार, जल पर्यटन वगेरे स्थानिकांच्या ताब्यात दिले जावे असा निर्णय घेण्यात आला आहे, हा निर्णय महाराष्ट्र भर करावा लागेल असा निर्णय घेण्यात बैठकीत घेण्यात आला, प्रकल्पग्रस्तांना नागरि सुविधा, खासगी जमीनीतील गावठाणांचा विषयावर चर्चा झाली.

मागासवर्गीय समाजासाठी शिक्षण, आरोग्य, घरबांधणी साठी सवलती आहेत त्या कोयना धरणग्रस्तांना देण्यात याव्यात,

महानिर्मीती मध्ये नोक-या, स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण द्यावे अशा मुद्यावर सकारात्मक असल्याचे मंत्री अनिल पाटील यांनी व्यक्त केले.

कोयना धरणग्रस्तांना विविध जिल्ह्यातील विखुरले असताना सुसुत्रता आणण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती केली, या समितीने २०१३ सालीच माहिती गोळा केली. तर मग आता काय शोधताय, प्रत्येक वेळी नवीन पात्रता तपासत आहेत का असा प्रश्न डॉ पाटणकर यांनी शेवटी केला,

## टंचाई काळात उपसाबंदी निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करा : जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी



**सातारा** : जिल्ह्यात सरासरी पेक्षा कमी पर्जन्यमान झाले आहे. पुढील काळात पाणी टंचाईचे संकट बिकट होऊ शकते. त्यामुळे ज्या ज्या विभागांना टंचाई निवरणार्थ उपायोजनांची जबाबदारी दिली आहे, अशा विभागांनी सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या. टंचाईच्या ठिकाणी उपसा बंदी निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करावी. उपसा बंदीचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. पाण्याचा अनधिकृत उपसा होऊ नये यासाठी भरारी पथके स्थापन करा, असे निर्देशही त्यांनी बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात जिल्हाधिकारी श्री. डुडी यांच्या अध्यक्षतेखाली टंचाई निवरनार्थ उपाययोजनांची आढावा बैठक झाली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी यशनी नागराजन, उपवनसंरक्षक आदिती भारद्वाज, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) विजया यादव, परिवीक्षाधिन आयएएस अधिकारी श्री. चंद्रा, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भाग्यश्री फरांदे, जिल्हा पुरवठा अधिकारी वैशाली राजमाने आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री. डुडी म्हणाले, जलस्त्रोतांमधून अनधिकृतपणे आकडे टाकून पाणी उचलणाऱ्यांच्या विद्युत जोडण्यात खंडीत कराव्यात. वापण्यात येणारे उपसा पंप जप्त करावेत. सद्यस्थितीत पाणी पुरवठ्याचे व्यवस्थापन व्यवस्थीत झाले नाही तर टंचाई काळात फार मोठ्या संकटाला सामोरे जावू लागते याचे भान ठेवून यंत्रणेने काम करावे. गट विकास अधिकाऱ्यांनी ग्रामस्तरावर समिती स्थापन करुन सरपंच आणि ग्रामसेवक यांच्याकडून या विषयाचा नियमित आढावा घ्यावा.

टंचाईस्थितीत करण्यात येत असणाऱ्या आराखड्यांचा तालुका निहाय आढावा घेऊन जिल्हाधिकारी श्री. डुडी म्हणाले, ज्या टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे अशा सर्व टँकरर्सचे जीपीएस प्रणालीद्वारे नियंत्रण करण्यात यावे. टँकरचा वापर पूर्ण क्षमतेने होईल याची दक्षता घ्यावी. अटल भूजल योजना, जलयुक्त शिवार, जलजीवन मिशन, गाळमुक्त धरण गाळयुक्त शिवार, रोजगार हमी या सारख्या योजनांमधून जल स्त्रोत बळकीटकरण करण्याची कामे प्राधान्याने करावीत. यासाठी तहसीलदारांनी कामांचे आराखडे तयार करावेत.

रोजगार हमी योजनेतील कामांचा आढावा घेत असताना जिल्हाधिकारी श्री. डुडी म्हणाले, टंचाई काळात लोकांना कामाची गरज पडू शकते अशा वेळी नरेगामधून बांबु लागवड आणि जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर घेण्यात यावी. जलजीवन मिशन कामांचा आढावा घेताना ते म्हणाले, ज्या कामांच्या प्रशासकीय मान्यता झाल्या नाहीत त्या ७ दिवसाच्या आत पूर्ण कराव्यात. जलयुक्त शिवार मधील ३ हजार कामे मे २०२४ पर्यंत पूर्ण करावीत.

मुख्य *संपादक : नरेश विठ्ठल देसाई हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील.

# कोरेगाव नगरपंचायतीच्या आंदोलनाबाबत विरोधी पक्ष नेत्याच्या दालनात चौकशीच्या सूचना

अजित जगताप)

**कोरेगाव :** सातारा जिल्ह्यातील श्रीमंत नगरपंचायत अशी ख्याती असलेल्या कोरेगाव नगरपंचायतीच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते रमेश अनिल उबाळे यांनी तीव्र आंदोलन केले होते. या आंदोलनाची गंभीर दखल घेऊन विधान परिषद विरोधीपक्षनेते श्री अंबादास दानवे यांनी याबाबत दोन्ही बाजू समजून घेण्यासाठी बैठक घेतली. या बैठकीला दोन्ही बाजू ऐकून घेऊन त्वरित चौकशी करून अहवाल सादर करण्याची सूचना केली.

आज मुंबई विधान भवन या ठिकाणी महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेते श्री श्री आंबादास दानवे यांच्या विरोधीपक्षनेते दालनामध्ये कोरेगाव नगरपंचायत विकास कामांबद्दल आढावा बैठक घेण्यात आली होती. आंदोलन करते श्री रमेश अनिल



- विधान परिषद विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या दानात झालेल्या बैठकीला उपस्थित नगर विकास व कोरेगाव नगरपंचायत अधिकारी व आंदोलन रमेश अनिल उबाळे (छाया- निनाद जगताप- मुंबई)

उबाळे यांनी उपोषणापूर्वी निवेदन देऊन कोरेगाव नगरपंचायतीच्या काही कामकाजाची चौकशी करावी. अशी मागणी केली होती. या मागणीकडे दुर्लक्ष केल्यामुळे त्यांनी आंदोलन केले. या ठिकाणी आदरणीय विरोधी पक्षनेते श्री दानवे व आ शशिकांत शिंदे यांनी भेट दिली होती.

आज आदरणीय विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या दालनामध्ये पुराव्यासह आंदोलकांनी आवश्यक कागदपत्रे सादर केलीहोती . तसेच कोरेगाव नगरपंचायत व नगर विकास खात्यामार्फत ही केलेल्या कामकाजाचे माहिती देण्यात आली होती. दरम्यान दोन्हीही बाजूचे म्हणणे विरोधी पक्षनेते यांनी ऐकून घेतले. विरोधी पक्षनेते यांनी कोरेगाव नगरपंचायत मुख्य अधिकारी यांना सूचना केल्या व नगर विकास मंत्रालयातील अधिकाऱ्यांना सादर केलेल्या कागदपत्राच्या अनुषंगाने उच्चस्तरीय कमिटी नेमून आठ दिवसात चौकशी करावी. अशा सूचना दिल्या त्या अनुषंगाने चौकशी व्हावी . यामध्ये नक्कीच न्याय मिळेल. घनकचऱ्याबाबत तसेच एका वर्षात डांबरी रस्ता व कॉंक्रीट रस्ता तसेच बॅटरी घोटाळ्यामध्ये वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा व या संबंधित सर्व व्यक्तींची चौकशी करावी. असे देखील आदेश विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते यांनी दिले. त्याची माहिती आंदोलक श्री रमेश उबाळे यांनी काही पत्रकारांना दिली आहे.

या बैठकीसाठी महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे आमदार शशिकांत शिंदे हे देखील उपस्थित राहणार होते. परंतु राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार यांची पार्टी मीटिंग आदरणीय पक्षश्रेष्ठी .शरदचंद्र पवार यांच्या सोबत असल्यामुळे ते या मिटींगला इच्छा असूनही उपस्थित राहू शकले नाहीत. मात्र त्यांनी विरोधी पक्षनेते यांच्याशी संवाद साधून माहिती सांगितली . अंदाजे सुमारे दीड ते दोन तास कोरेगाव नगरपंचायतीच्या कामकाजाबाबत सर्व विषयांवर चर्चा झाल्या. नगर विकास खाते व सातारा जिल्हाधिकारी कार्यालय तसेच कोरेगाव नगरपंचायत मुख्याधिकारी यांनी सुद्धा केलेल्या कामाचा अहवाल सादर केलेला आहे. याची पडताळणी करून आठ दिवसात दूध का दूध आणि पाणी का पाणी होणार.... असल्याने कोरेगाव नगरपंचायत मधील नागरिकांचे या गोष्टीकडे लक्ष लागलेले आहे. दरम्यान ,याबाबत कोरेगाव नगरपंचायत यांच्याशी संपर्क साधला असता संपर्क होऊ न शकल्याने त्यांची बाजू नमूद करता आलेली नाही.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संकुलावरील सभागृहाच्या बांधकामाची गाडी पुन्हा रुळावर

### माजी नगरसेविका सुरेखा बच्छाव यांच्या प्रयत्नांना अखेर यश



**सटाणा :** सटाणा नगर परिषद हद्दीतील प्रभाग क्र.९ मध्ये दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिटी सर्व्हे. नं. २००८ मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यापारी संकुलावर बहुउद्देशीय सार्वजनिक हॉलच्या बांधकामास जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडून दि. २६ मार्च २०२१ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली होती. त्यानुसार सटाणा नगर परिषदेने दि. २५ मार्च २०२१ रोजी निविदा मागवित यासंबंधिची निविदा मंजूर करून प्रज्ञा बिल्डकॉन, सटाणा यांना दि. २१ ऑक्टोबर २०२१ रोजी बांधकाम कार्यारंभ आदेश देण्यात आला होता, सदर आदेशामुळे संबंधित ठेकेदाराने काही प्रमाणात बांधकाम केले होते, मात्र नगरपरिषदने पुढील रक्कम अदा न केल्याने संबंधित ठेकेदाराने उर्वरित बांधकाम व नियोजित कामे केलेली नव्हती. या दिरंगाईमुळे करारनाम्याचा भंग केला होता.

या बहुउद्देशीय सभागृहाचे काम बारगळल्यामुळे दि. २० डिसेंबर २०२३ रोजी स्वच्छतेचे प्रणेते संत गाडगेबाबा जयंतीच्या दिवशी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ सुरेखाताई बच्छाव यांनी आमरण उपोषण केले होते त्याची दखल घेत जिल्हाधिकारी नाशिक यांनी सदर कामासाठी ७८ लाख, पंचविस हजार चारशे एक्केचाळीस रुपये मंजुर निधीची रक्कम नुकतीच सटाणा नगर परिषदेच्या खात्यात वर्ग केली असल्याची माहिती माजी नगरसेविका सुरेखाताई बच्छाव यांनी दिली. यामुळे उर्वरित बांधकाम लवकरच पूर्ण होणार असल्याने परीसरातील नागरीकांनी आनंद व्यक्त केला आहे. हे बहुउद्देशीय सभागृह म्हणजे शहरातील महत्वाच्या सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी उपलब्ध होणारी हक्काची वास्तू असणार असल्याने मा. नगरसेविका सुरेखाताई प्रकाश बच्छाव यांनी त्यासाठी वेळोवेळी पाठपूरावा केला होता, या लढ्याला यश येण्यामागे सर्व समाज बांधवाचे बळ एकवटले होते म्हणून हे शक्य होत आहे अशी भावना व्यक्त करत त्यांनी जनतेचे आभार मानले.

# वडगावात महावितरण अधिकाऱ्याला गुलाब पुष्प देऊन दिले निवेदन

### वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करा; वडगाव राष्ट्रवादी काँग्रेसची मागणी

**वडगाव मावळ :** वडगाव परिसरात सातत्याने वीजपुरवठा खंडित होत आहे.या प्रकाराला कंटाळून राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार वतीने महावितरणच्या अधिकारी शाखा अभियंता मनोज नेमाडे व कनिष्ठ अभियंता राहुल लकडे यांना गुलाब पुष्प देत निवेदन दिले आहे. या कारभारात सुधारणा व्हावी,अशी मागणी या महावितरणच्या अभियंत्यांकडे निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेल अध्यक्ष अतुल राऊत ,मावळ तालुका राष्ट्रवादी युवका काँग्रेसचे अध्यक्ष विशाल वहिले,मावळ तालुका राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सचिव पंकज भामरे, वडगाव शहर राष्ट्रवादी पदवीधर सेल अध्यक्ष सौरभ सावले , शैलेश खैरे , अभिषेक ढोरे उपस्थित होते



निवेदन म्हटले आहे की

वडगाव शहरातील प्रभाग क्रमांक ६ व ७ मधील पंचमुखी मारुती मंदिर परिसर ,खंडोबा मंदिर परिसर ,मल्हार रेसिडेन्सी ,एकविरानगर कॉलनी ,लक्ष्मी नगर कॉलनी व परिसरातील नागरिकांनादररोज सकाळी विद्युत पुरवठा खंडित होऊन नाहक या समस्येला रोज तोंड द्यावे लागत आहे .गेल्या अनेक दिवसांपासून या संपूर्ण परिसरात दररोज सकाळची वीज खंडित होत आहे. विद्यार्थी, कामगार वर्ग, महिलांना या समस्येला तोंड द्यावे लागत आहे या कार्यक्षेत्रात श्री रमेशकुमार सहानी इंग्लिश मीडियम स्कूल देखील असून त्याचबरोबर तालुका कृषी ऑफिस देखील या परिसरात आहे, अनेक बंधू-भगिनी घरूनच वर्क फ्रॉम होम करत आहेत व इतर छोटे मोठे व्यावसायिक हे देखील त्रस्त झालेले आहेत.

वडगाव शहरातील प्रभाग क्रमांक ६ व ७ मधील पंचमुखी मारुती मंदिर परिसर ,खंडोबा मंदिर परिसर ,मल्हार रेसिडेन्सी ,एकविरानगर कॉलनी ,लक्ष्मी नगर कॉलनी व परिसरातील नागरिकांनादररोज सकाळी विद्युत पुरवठा खंडित होऊन नाहक या समस्येला रोज तोंड द्यावे लागत आहे .गेल्या अनेक दिवसांपासून या संपूर्ण परिसरात दररोज सकाळची वीज खंडित होत आहे. विद्यार्थी, कामगार वर्ग, महिलांना या समस्येला तोंड द्यावे लागत आहे या कार्यक्षेत्रात श्री रमेशकुमार सहानी इंग्लिश मीडियम स्कूल देखील असून त्याचबरोबर तालुका कृषी ऑफिस देखील या परिसरात आहे, अनेक बंधू-भगिनी घरूनच वर्क फ्रॉम होम करत आहेत व इतर छोटे मोठे व्यावसायिक हे देखील त्रस्त झालेले आहेत.

वडगाव मावळ स्मशानभूमीतील जो डीपी बॉक्स आहे तो नादुरुस्त

अवस्थेत आहे तो बॉक्स बदलावा. अनेक ठिकाणी खांबावरील तारांना झोळ निर्माण झाल्यामुळे वारंवार फ्युज जात आहे.वडगांव स्मशानभूमी जवळील ट्रान्सफॉर्मर ची क्षमता वाढवावी. उन्हाळ्यात ट्रान्सफॉर्म गरम होऊन त्यातनं ऑइल बाहेर येण्याची शक्यता असते त्यामुळे आपण त्याला ट्रान्सफॉर्मर कव्हर बसून घ्यावेत अशी मागणी या निवेदनातून देण्यात आली

# सावळज खून प्रकरणातील आरोपींना अटक

### प्रेमसंबंध व पूर्ववैमान्यातून खून झाल्याची माहिती

तासगाव, सावळज (ता. तासगांव) येथे दि. ७ फेब्रुवारी रोजी भारत उर्फ संतोष संजय पाटील या तरुणाच्या खून प्रकरणातील मुख्य २ आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले आहे. जवळपास आठवडाभरापूर्वी झालेल्या खून प्रकरणामुळे सावळज परिसरात गूढ निर्माण झाले होते. पोलीस प्रशासनाने अत्यंत खूबीने केलेल्या तपासामुळे या खून प्रकरणाचा तपास लागण्यात यश मिळाले आहे. तासगाव उपविभागीय अधिकारी, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग सांगली व तासगाव पोलीस निरीक्षक यांनी गेले सात दिवस सावळजमध्ये खुन प्रकरणाच्या तपासासाठी ठिय्या मांडला होता.



याबाबत अधिक माहिती अशी आहे, दि.०७.०२.२०२४ रोजी रात्रो ०९.४५ वाजण्या पुर्वी तासगांव पोलीस ठाणे हद्दीतील सावळज गावचे हद्दीत माळी वस्ती ते पाटील वस्ती जाणारे कच्च्या रस्त्यावर संजय लक्ष्मण पवार यांचे शेततळ्याजवळील इसम नामे भारत ऊर्फ संतोष संजय पाटील वय २९ वर्षे रा. सावळज ता. तासगांव जि.सांगली याचा कोणीतरी अज्ञात इसमांनी कोणत्यातरी हत्याराने डोक्यात मारुन गंभीर जखमी करून त्याचा खुन केल्याबाबत तासगांव पोलीस ठाणे गुरनं. ७४/२०२४ भादविस कलम ३०२ प्रमाणे मयताची आई वैशाली संजय पाटील वय ४२ वर्षे रा. पाटीलमळा सावळज ता. तासगांव जि.सांगली यांनी फिर्याद दाखल केली होती. या गुन्हयाचा तपास सपोनि दिपक भांडवलकर हे करीत होते.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने पोलीस अधिक्षक संदीप घुगे व अप्पर पोलीस अधिक्षक 'रितु खोखर यांनी सदर गुन्हयातील आरोपींचा शोध घेऊन गुन्हा उघड करण्याकरीता सुचना व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे सचिन थोरबोले उपविभागीय पोलीस अधिकारी तासगांव विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतिश शिंदे स्था. गु.अ.शाखा सांगली व पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ तासगांव पोलीस ठाणे यांचेकडील तपास पथके तयार करून या गुन्हयामागील कारणाचा शोध घेत गुन्हा उघडकीस आणणेकरीता प्रयत्न करीत होते.

त्याअनुषंगाने तपास चालू असताना पोलीस निरीक्षक सोमनाथ बाघ तासगांव पोलीस ठाणे यांचे पथकातील गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अंमलदार अमर सुर्यवंशी, प्रशांत चव्हाण व सागर टिंगरे यांना यांना त्यांचे गोपणीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, सदरचा खुन हा सावळज गावातील इसम नामे १) बाळासाहेब संजय पाटील धंदा मिस्त्री वय २७ वर्षे २) हणमंत सदाशिव वांडरे धंदा जिम ट्रेनर वय २५ वर्षे दोघे रा. सावळज, ता. तासगांव, जि.सांगली या दोघांनी केला असल्याबाबत खात्रीशीर माहिती मिळाल्याने.

पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने तासगांव पोलीस ठाणेकडील व स्था. गु.अ शाखा सांगली यांची पथके गुन्हयातील आरोपींचा शोध घेत असताना सदर आरोपी हे सावळज गावी जिममध्ये थांबले आहेत अशी बातमी मिळाल्याने सपोनि दिपक भांडवलकर व कुमार पाटील यांचे पथकाने मिळून मिळाले बातमीप्रमाणे सावळज गावी महारूद्र जिम जवळ आजूबाजुचे परिसरात सापळा रचून सदर इसमांना पळून जाण्याची संधी न देता ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नांव, गांव विचारता त्यांनी त्यांची नांवे १) बाळासाहेब संजय पाटील धंदा मिस्त्री वय २७ वषे २) हणमंत सदाशिव वांडरे धंदा जिम ट्रेनर वय २५ वर्षे दोघे रा. सावळज, ता. तासगांव, जि. सांगली अशी असल्याची सांगितली. त्यांचेकडे संतोष पाटील याचे खुनाच्या अनुषंगाने विश्वासात घेवून चौकशी केली असता वरील संशयित आरोपी यांनी उडवाउडवीची उत्तरे दिल्याने त्यांचेकडे कसोशिने व कौशल्यपूर्वक तपास केला असता आरोपी क्र.१ बाळासाहेब पाटील याने सांगितले की, मयत संतोष पाटील याचे गावातील महिलेशी असलेल्या प्रेमसंबंध व जुन्या भांडणाचे रागातुन आरोपींनी मयत संतोष पाटील हा गावातून घराकडे जात असताना अंधारात त्याचा पाठलाग करून त्यास रस्त्यात गाटुन आपले गाडीतील पेट्रोल संपल्याने पेट्रोल मागण्याच्या बहाण्याने रस्त्यात थांबवून लोखंडी रॉडने डोक्यात मारून सदरचा खुन केला असल्याबाबत प्राथमीक तपासात निष्पन्न झाले आहे. सदर आरोपींकडे गुन्हयाचे अनुषंगाने तपास सुरू असून पुढील तपास सपोनि दिपक भांडवलकर हे करीत आहेत.

सावळज येथील भारत उर्फ संतोष पाटील यांच्या खून प्रकरणानंतर पोलिसांनी तपासाची चक्रे अत्यंत गतीने फिरवली. मयत संतोष पाटील याच्या आईच्या फिर्यादीनुसार काही संशयतांना पोलिसांनी ताब्यात घेऊन त्यांच्याकडे चौकशी केली होती. परंतु पोलिसांना पहिल्यापासूनच या खून प्रकरणात वेगळं काहीतरी असल्याचा संशय होता. पोलिसांनी अत्यंत खुबीने या प्रकरणाचा तपास करून अवघ्या सात दिवसात मुख्य आरोपींना ताब्यात घेऊन या खून प्रकरणाचा उलगडा केला. पोलिसांच्या या कामगिरीबद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# खोडद येथे वृद्ध महिलेचा खून करून जबरी चोरी करणारी बंटी बबलीची जोडी ४८ तासात जेरबंद

### नवनियुक्त जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी प्रत्यक्ष दिली माहिती

**नारायणगाव :** खोडद (ता. जुन्नर) येथे सोमवार दि. १२ फेब्रुवारी रोजी दुपारी धनवट मळा येथील जेष्ठ महिला सुलोचना कोंडीभाऊ टेमगिरे (वय ७० वर्षे) या एकट्या घरी असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्या गळ्यावर धारदार हत्यारांनी वार करून त्यांचा खून केला होता. त्यांच्या घरातील कपाट उचकटलेले व कपडे अस्ताव्यस्त पडलेले निदर्शनास आले होते. या प्रकरणी नारायणगाव पोलीस ठाण्यात भारतीय दंड विधान कायदा कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला होता. ग्रामीण भागात भर दिवसा खून झाल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले होते. जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे, व उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांनी गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखा व नारायणगाव पोलिसांची पथके तयार करून गुन्ह्याची उकल करण्याची सूचना व मार्गदर्शन केले. त्यानुसार अवघ्या ४८ तासात परिसरातील रस्त्यांवरील सीसीटीव्ही फुटेज तपासून तसेच गोपनीय बातमीदाराच्या माहितीनुसार या खूनातील आरोपी शोधण्यास पोलिसांना यश आले आहे.



या घटनेतील आरोपी हे बंटी और बबली नवरा बायको असून आरोपी शिवम उर्फ संकेत श्याम श्रीमंत व २१ वर्ष व पूनम संकेत श्रीमंत वय २० वर्ष दोघेही मूळ राहणार गजानन नगर, चिखली ता. चिखली, जिल्हा बुलढाणा यांनी मयत सुलोचना टेमगिरे यांच्या राहत्या घरातून त्यांचा मोबाईल व सोन्याचे दागिने चोरी केल्याचे सांगितले. त्यांच्याकडून चोरी केलेला मोबाईल हस्तगत करण्यात आला असून सोन्याच्या दागिनाबाबत त्यांच्याकडे चौकशी चालू आहे. दोन्ही आरोपींना जुन्नर न्यायालयात हजर करण्यात आले असून तीन दिवस पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान दोन्ही आरोपी नवरा बायको असून आठ दिवसापूर्वीच खोडद येथील धनवट मळा परिसरात ते शेतात मजुरीसाठी आले होते.

ही कामगिरी जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधीक्षक रमेश चोपडे उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल गावडे, पोलीस उपनिरीक्षक सनिल धनवे, विनोद धुर्वे, जगदेव आप्पा पाटील, अभिजीत सावंत, पोलीस अंमलदार दीपक साबळे, राजू मोमीन, अतुल डेरे, प्रकाश वाघमारे, विक्रम तापकीर, मंगेश थिगळे,अक्षय नवले, संदीप वारे, शैलेश वाघमारे, तुषार भोईटे, संतोष कोकणे, अमोल शेडगे, धीरज जाधव, सत्यम केळकर, निलेश शिंदे, अक्षय सुपे, दगडू विरकर, सचिन सातपुते, आदिनाथ लोखंडे, गोविंद केंद्रे, मंगेश लोखंडे, दत्ता ढेंबरे, महिला अंमलदार तनश्री घोडे यांनी यशस्वी तपास केला.

# मुंबईकरांचे प्रश्न मार्गी लावल्याबद्दल २० फेब्रुवारी रोजी 'धन्यवाद देवेंद्रजी' कार्यक्रमाचे आयोजन

### भाजपा आ. प्रवीण दरेकर यांची माहिती

मुंबईकरांचे गृहनिर्माण क्षेत्रातील अनेक प्रश्न मार्गी लावल्याबद्दल भारतीय जनता पार्टी, मुंबई जिल्हा सहकारी गृहनिर्माण महासंघ आणि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या वतीने २० फेब्रुवारी रोजी ''धन्यवाद देवेंद्रजी'' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती मुंबई बँकेचे अध्यक्ष व भाजपा आ. प्रवीण दरेकर यांनी बुधवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आ.दरेकर बोलत होते.



आ.प्रसाद लाड, भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, भाजपा प्रदेश प्रवक्ते आसिफ भामला आदी यावेळी उपस्थित होते. २० फेब्रुवारी रोजी काळाचौकी अभ्युदय नगर येथील भगतसिंग मैदानावर हा कार्यक्रम होणार आहे.

आ. दरेकर यांनी सांगितले की,लाखो मुंबईकरांचे गृहनिर्माण क्षेत्रातील प्रश्न सोडविण्यासाठी गोरेगाव येथे गृहनिर्माण संस्थांच्या सहकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत करण्यात आलेल्या अनेक मागण्या मान्य करत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईकरांना दिलासा दिला आहे. या परिषदेतील १६ विषयांबाबत राज्य शासनाने शासन निर्णयही जारी केले आहेत. अनेक वर्षांच्या मुंबईकरांच्या मागण्या मान्य करत प्रश्न मार्गी लावल्याबद्दल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई भारतीय जनता पार्टीच्या पुढाकाराने होणाऱ्या या कार्यक्रमाला गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, मुंबई उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, मुंबई भाजपा अध्यक्ष आ.आशीष शेलार, मुंबई जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष सिद्धार्थ कांबळे, माजी आमदार बाळा नांदगावकर, हौसिंग फेडरेशनचे अध्यक्ष प्रकाश दरेकर आदी उपस्थित राहणार आहेत. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार स्वयं पुनर्विकासाची प्रकरणे एक खिडकी योजनेच्या माध्यमातून राबविली जाणार आहेत, तसेच स्वयंपुनर्विकासाकरीत कर्जावर व्याज सवलत ही देण्यात येणार आहेत, अशी माहितीही आ. दरेकर यांनी दिली.

# सेवाप्रवेशोत्तर परीक्षा १७ व १८ फेब्रुवारी रोजी

**सातारा :** जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसाठी विहित केलेली सेवाप्रवेशोत्तर परीक्षा शनिवार दि. १७ फेब्रुवारी व रविवार दि.१८ फेब्रुवारी रोजी अण्णासाहेब पाटील कल्याणी विद्यालय कॅम्प, सातारा येथे विभागीय आयुक्त पुणे यांच्यामार्फत घेण्यात येणार आहे, अशी माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी निलेश घुले यांनी दिली आहे.

# मनोज जरागे पाटील यांचे समर्थनार्थ गोंदवले बुद्रुक येथे कडकडीत बंद



**गोंदवले :** मनोज जरागे यांचे समर्थनार्थ गोंदवले बुद्रुक येथे कडकडीत बंद पाळण्यात आला सकल मराठा समाज यांच्या आव्हानांना प्रतिसादा देत श्री क्षेत्र गोंदवले बुद्रुक येथील सर्व बाजारपेठेत कडकडीत बंद पाळण्यात आला

एरवी गजबजलेल्या बाजारपेठेत आज निरव शांतता होती श्री ब्रह्मचैतन्य महाराज गोंदवलेकर समाधी मंदिरात येणाऱ्या भाविकांची कुचंबना झाली सर्व बंद शांततेत झाला. बंद मुळे सर्वत्र शुकशुकाट जाणवत होता.

# मावळातील कान्हे येथे साकारले जाणार शिवस्मारक

## तळ्याचे सुशोभीकरण, प्रशस्त हॉलही उभारणार

**वडगाव मावळ :** ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील आंबेवाडी येथे शिवाजी महाराजांचा बारा फूट उंचीचा पुतळा तसेच सभागृह,तळे सुशोभीकरण असे प्रेरणादायी शिवस्मारक साकारले जात आहे.

कान्हे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील आंबेवाडीत हि विविध विकासकामे होणार असून या कार्यक्रमाचे भूमिपूजन मावळचे आमदार सुनील शेळके यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.



या कार्यक्रम प्रसंगी,किशोर पं सातकर,संदीप आंद्रे,प्रकाश आगळमे,सुजाता चोपडे,गिरीश सातकर,महेश सातकर,अश्विनी शिंदे, आशा सातकर,रुपाली कुटे,मनीषा ओव्हाळ,सोपान ज्ञानेश्वर धिंदळे,किशोर सातकर,सोनाली सातकर, बाबाजी चोपडे,संदीप नामदेव ओव्हाळ,आरिफ मुलाणी,रोहिणी चोपडे,पुजा चोपडे,ग्रामविकास अधिकारी संतोष शिंदेसह ग्रामस्थ, महिला भगिनी,युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्याचबरोबर कान्हे ग्रामस्थांच्या मागणीनुसार भविष्यकाळामध्ये सर्वसामान्य नागरिकांना उपयोगी असे सभागृह, जिम,महिला योगा सेंटर व सार्वत्रिक कार्यक्रमांच्या उद्देशाने ३५० ते ४०० लोक बसतील अशा प्रशस्त हॉलचे महिलांना प्रशिक्षणासाठी, इतर सर्व प्रकारचे ट्रेनिंग साठी, विवाह सोहळा व वाढदिवसाच्या सार्वजनिक वापरासाठी एक अद्यावत सभागृह मौजे कान्हे - आंबेवाडी येथे उभारण्यात येणार आहे. आंबेवाडी येथील सिद्धिविनायक सोसायटी मधील अंबादास पाचपोर यांनी तीन एकर जागा ग्रामपंचायतीस बक्षीसपत्र करून,७/१२ ग्रामपंचायतीच्या नावे करून दिला आहे.यासाठी सरपंच विजय वामन सातकर,सदस्य किशोर प्रभाकर सातकर व भाऊ शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले आहे.त्याबद्दल सरपंच विजय वामन सातकर व ग्रामपंचायत कान्हे यांच्या वतीने श्री.अंबादास पाचपोर यांचा सन्मान व आभार व्यक्त केले.



# वडूज बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

**वडूज :** मराठा समाजाच्या आरक्षणासंदर्भात विविध मागण्यांसाठी आज पुकारण्यात आलेल्या महाराष्ट्र बंदला खटाव तालुक्यातील वडूज येथे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

क्रांतीयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे गेल्या पाच दिवसांपासून उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाच्या समर्थनार्थ आज महाराष्ट्र बंदची हाक देण्यात आली होती. शासकीय कार्यालये सुरू असली तरी बंदमुळे सकाळपासूनच सर्वत्र कमालीचा शुकशुकाट दिसत होता.

सकल मराठा समाज बांधवांनी शहरातून फेरी काढून नागरिकांना बंदचे आवाहन केले. नागरिकांनीही स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवून प्रतिसाद दिला.

# ना.शंभूराज देसाई यांचे प्रयत्नातून मंजूर ०३.१० कोटींच्या विकास कामांचे भूमिपूजन संपन्न

**पाटण :.** पालकमंत्री ना.शंभूराज देसाई यांनी विशेष प्रयत्न करुन पाटण तालुक्याच्या विकासासाठी सर्वाधिक विकास निधी आणण्याचे काम केले आहे. त्यातच चाफळ विभागातील मतदारांनी ना.देसाईंवर भरभरुन प्रेम केल्यामुळे या विभागाला विकास कामांमध्ये झुकते माप दिले आहे.तर पाडळोशी गावाचे आणि देसाई परिवाराचे स्नेहाचे संबंध असून सत्ता असो वा नसो या गावातील ग्रामस्थ ना. शंभूराज देसाई यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिल्याने पालकमंत्री ना.शंभूराज देसाई यांनी पाडळोशी गावाच्या विकासासाठी भरघोस निधी मंजूर केल्याचे प्रतिपादन मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराज देसाई यांनी केले.



पालकमंत्री ना.शंभूराज देसाई यांचे प्रयत्नातून मंजूर झालेल्या पाडळोशी ग्रामपंचायती अंतर्गत ०३ कोटी १० लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचा भूमिपूजन सोहळा मोरणा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रविराज देसाई यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य डी. वाय.पाटील,संजय गांधी निराधार योजना समितीचे अध्यक्ष भरत साळूंखे,शिवदौलत बँकेचे संचालक चंद्रकांत पाटील,लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखान्याचे संचालक प्रशांत पाटील,कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील,शिवशंभू दूध संघाचे संचालक जयदिप पाटील,संदिप यादव,मनोहर कडव,शिवाजी बोंगाणे,सरपंच अलका तावरे,उपसरपंच निलेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

ते पुढे म्हणाले की, पाडळोशी ग्रामपंचायतीमध्ये एका वर्षापूर्वी सत्तांतर झाल्यानंतर ना.शंभूराज देसाई यांचे नेतृत्वाखाली सरपंच,उपसरपंच व सदस्य मोठया मताधिक्याने निवडूण आले.त्यानंतर एका वर्षाच्या कालावधीमध्ये निवडणूकीमध्ये पाडळोशी गावातील नागरीकांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी ना.देसाई यांचे कडे सातत्याने पाठपुरावा केला. त्याचे फलित म्हणून पालकमंत्री ना.देसाई यांचे प्रयत्नातून पाडळोशी गावच्या विकासासाठी केवळ एका वर्षामध्ये पाच कोटींच्या वर निधी मंजूर केला तर आज आपण तीन कोटी दहा लक्ष रुपयांच्या विकास कामांचा भूमिपूजन कार्यक्रम करत आहोत. केवळ एका वर्षामध्ये ना.देसाई यांनी पाडळोशी गावामध्ये विकास कामांचा डोंगर उभा केला असून केवळ एका वर्षामध्ये जर एवढी कामे ना.शंभूराज देसाई यांचे माध्यमातून गावामध्ये मार्गी लागणार असतील तर पुढील पंचवार्षिकमध्ये विकासाची कामे शिल्लक राहतील की नाही असे स्पष्ट करत ते पुढे म्हणाले की विकास कामांची प्रक्रिया ही न थांबणारी असून एवढया मोठया प्रमाणांत निधी मंजूर केल्यानंतर नंतर निधी मंजूर होईल का अशी तिळमात्र शंका मनात न आणता पाडळोशी गावच्या विकासाठी अजून काही निधीची गरज असल्यास ना.शंभूराज देसाई यांचेकडे पाठपुरावा करावा.नक्की यापुढील काळामध्ये या कामांनाही अशाच पध्दतीने भरघोस निधी मंजूर होईल असे सांगत यापुढील काळामध्ये ज्या पध्दतीने पाडळोशी ग्रामपंचायतीमध्ये आपण भरघोस मतांनी विजय मिळवला,आता विकासाची कामे मार्गी लावत आहोत,त्यामुळे येणाऱ्या

# वनविभागाच्या विरोधात संगमनगर येथे मंगळवारी रास्तारोको आंदोलन

## बबनराव कांबळे यांचे प्रांताधिका-यांना निवेदन

**पाटण :** कोयना विभागात वन्यप्राण्यांनी हैदोस घातला असून शेतक-यांचा शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, वन्यप्राण्यांच्या हल्लात आजवर अनेक नागरिक मृत्युमुखी पडले असून कित्येक जण जायबंदी झाले आहेत, यावर अनेकदा आंदोलने केली, चर्चा झाल्या, मात्र वनविभागाकडून ठोस उपाययोजना झाल्या नाहीत या विरोधात शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मंगळवार दिनांक २२ रोजी संगमनगर (धक्का) येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा पाटण पंचायत समिती सदस्य बबनराव कांबळे यांनी दिला आहे.

याबाबतचे निवेदन प्रांताधिकारी, पाटण यांना दिले आहे. निवेदनात म्हटले आहे की कोयना भागात रानटी जनावरांकडून शेती उद्धस्त झाली आहे, गवे, डुक्कर, बिबट्या, माकडे यांचा गावात वावर



प्रांताधिकारी सुनील गाढे यांना निवेदन देताना बबनराव कांबळे, व कार्यकर्ते, ग्रामस्थ.

वाढला आहे, या प्राण्यांकडून शेती सह पशुधन तसेच मानवी जीवांवर हल्ले होत आहेत. अनेक जण मृत्यूमुखी पडले आहेत तर जखमी सुद्धा झाले आहेत,

याबाबत अनेकदा आंदोलने, चर्चा केल्यात मात्र वनविभागाकडून त्यावर मार्ग निघाला नाही, या विरोधात भागातील जनतेत संताप असुन वनविभागाच्या विरोधात रास्तारोको आंदोलन करणार असल्याचे म्हटले आहे,

या निवेदनाच्या प्रती उपविभागीय पोलिस अधिकारी, वन्यजीव अधिकारी, कोयना पोलिस यांना देण्यात आल्या असून निवेदनावर बबनराव कांबळे, डि. पी कदम, बाळासाहेब कदम, पंकज गुरव, परशुराम बेबले, पी.पी साळुंखे, दिपक माने, दगडू गायकवाड, संजय कांबळे, गोविंद बल्लाळ, सुरेश लोखंडे, रोहन माने, दादू रोकडे आदी ग्रामस्थांच्या सह्या आहेत.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांच्या वर झालेल्या भ्याड हल्याचा निषेध व्यक्त करत हल्लेखोरांवर कारवाई व्हावी अशा मागणीचे निवेदन देण्यात आले.



# अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा उपयोग सर्वसामान्यांसाठी व्हावा : डॉ. पगारिया

**भोसरी :** अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि उपचार पद्धती चा उपयोग सर्वसामान्यांना झाला पाहिजे .त्यासाठी या सेवा सर्वसामान्यपणे माफक दरामध्ये द्यावेत .कोणतेही दुखणे अंगावर न काढता त्या त्या क्षेत्रातील तज्ञांचा सल्ला घेतला पाहिजे .असे प्रतिपादन जेष्ठ शिक्षण तज्ञ समाजसेवी भगवान महावीर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ अशोककुमार पगारिया यांनी स्वस्तिक डेंटल केअर च्या तेविसाव्या आरोग्य दिन व वर्धापन दिन औचित्य साधून आयोजित स्नेह मेळाव्यात प्रसंगी आपले मत व्यक्त केले. यावेळी प्रसिद्ध दंत चिकित्सक डॉ विश्वास पाटील ,डॉ संतोष शिंगोटे ,हास्य अभिनेते बंडा जोशी ,श्री क्षेत्र आळंदीचे माजी शहराध्यक्ष सुरेश काका वडगावकर ,राजगुरुनगर जैन श्रावक संघाचे अध्यक्ष प्रकाश गदिया , उद्योजक रामदास जैद ,मारुती येळवंडे , जैन सोशल फेडरेशन चे राजेंद्र धोका, भाजप व्यापार आघाडीचे अध्यक्ष सुरेश गदिया, ह भ प दिगंबर ढोकले महाराज ,पिंपरी चिंचवड शहरातील जैन श्रावक संघाचे विविध पदाधिकारी, गौतम निधी फाउंडेशनचे पदाधिकारी, मा नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते ,आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ पाटील यांनी मौखिक आरोग्याचे महत्त्व प्रतिपादन केले मानवी शरीरामध्ये होणाऱ्या विविध आजारांची प्रथम ओळख दंतवैद्यकीय तज्ञांना होते .

# एस.टी.बसने ठोकरल्याने मजुराचा जागेवर मृत्यू



**वडूज :** एसटी ने दुचाकीस्वारास समोरून धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात वडूज पुसेगाव रस्त्यावर सातेवाडी गावानजिक आज दुपारी झाला. पांडूरंग काशिनाथ इंगळे ( वय

४२,मूळ गाव महिमानगड-शिंदी,ता.माण, हल्ली रा.वाकेश्वर ता.खटाव) असे अपघातातील मयताचे नाव आहे. याबाबत त्यांचा मुलगा इंद्रजीत इंगळे याने पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादीतदिलेल्या माहितीनुसार, इंगळे कुटूंबिय वाकेश्वर येथे राहण्यास आहेत. येथील जाधव ट्रेडर्स या दुकानात पांडूरंग इंगळे हे गेल्या चार वर्षापासून कामाला होते. आज दुपारी इंगळे हे दुचाकी क्रमांक (एम. एच.११, सी.टी. ९१६६ ) वरून काही कामानिमित्त वडूजहून वाकेश्वरला जात होते. त्यावेळी सातेवाडी गावच्या वळणावरून काही अंतर पुढे गेल्यानंतर समोरून येणाऱ्या पारगाव खंडाळा आगाराच्या सातारा - गाणगापूर ( क्रमांक एम.एच.१४ बीटी ४८८५) या बसने इंगळे यांना जोराची धडक दिली. त्यामध्ये इंगळे यांच्या डोक्याला व हातापायांना मार लागून ते गंभीर जखमी झाले. पुढील उपचारासाठी त्यांना येथील ग्रामीण रूग्णालयात नेण्यात आले मात्र उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.याप्रकरणी बस चालक राजू आप्पासो साळुंखे (रा. पारगाव खंडाळा) यांच्या विरोधात इंगळे यांनी तक्रार दिली आहे.

# सत्तेत वाटा मिळालाच पाहिजे

## न्याय मिळत नसेल तर आरपीआय आठवले गटाला वेगळा विचार करावा लागेल : अशोक कांबळेंचा एल्गार..!



### आरपीआय कडून मांडण्यात आलेल्या मागण्या..!

* सांगली जिल्ह्यातील अंकलखोप येथे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यात यावे.
* लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे वाटेगाव येथील स्मारक उभारण्यात यावे.
* समाज कल्याण विभागाचे कार्यालय प्रत्येक तालुका स्तरावर सुरू करण्यात यावे.
* मागासवर्गीय यांच्या कल्याणाकरता आलेला निधी खर्च करण्यात यावा.
* योजनांचा लाभ नाकारणाऱ्या राष्ट्रीयकृत बँका व अधिकारी यांच्यावर योग्य ती कारवाई झाली पाहिजे.
* जातीच्या दाखल्यासाठी १९५० च्या पुराव्याची जाचक अट तातडीने रद्द करून १९६८ च्या पुराव्याची अट लागू करण्यात यावी.
* गाव तिथे अभ्यासिका, तालुका तिथे वस्तीगृहे बांधण्यात यावी.
* झोपडपट्टी धारकांना म्हाडा अंतर्गत पक्की घरे बांधून देण्यात यावी.
* कोल्हापूर चाळ येथील सावित्रीबाई फुले वसाहती मधील झोपडपट्टीचे अतिक्रमण रेल्वे प्रशासनाने हटवण्यापूर्वी झोपडपट्टीचे महापालिकेने संपूर्ण पुनर्वसन करावे.

आदी मागण्याबाबत पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे कार्याध्यक्ष अशोक कांबळे यांच्याकडून सांगण्यात आले.



**मिरज :** महाराष्ट्रातील दलित पँथर व आरपीआय आठवले गटाचे चळवळीत धडाडीने काम करणारे नेते विवेकरावजी कांबळे यांच्या निधनानंतर सांगली जिल्ह्यात आरपीआय गट रिचार्ज करण्यासाठी जिल्हा कार्याध्यक्ष अशोक कांबळे यांनी पुढाकार घेतला असून रस्त्यावर उतरून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची खरी चळवळ जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा क्षेत्रात मोठ्या ताकतीने राबवली जाणार आहे.

त्याचबरोबर लोकसभा व विधानसभा निवडणुकीत संदर्भात पुढील दिशा ठरवण्यासाठी दिनांक १८ फेब्रुवारी २०२४ रोजी मिरजेतील शेतकरी भवन मार्केट यार्ड येथे कार्यकर्त्यांची बैठक आयोजित करण्यात आली असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे सांगली जिल्हा कार्याध्यक्ष अशोक कांबळे यांनी जिल्ह्यात पक्षाची पुनर्बांधणी करून पक्ष भक्कम व मजबूत करण्याचे काम जोमाने करणार असल्याचे सांगितले. १८ फेब्रुवारीला होणाऱ्या कार्यकर्त्यांच्या आढावा बैठकीत जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांशी चर्चा विनिमय, पक्षाची ध्येय धोरणे, मागासवर्गीयांचे प्रश्न मांडण्यात येणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष सूर्यकांत (आण्णा) वाघमारे उपस्थित राहणार आहेत.

सद्यस्थितीत भाजपा बरोबर आरपीआय आठवले गटाची युती आहे पण आरपीआय पक्षाला न्याय मिळत नाही. मागासवर्गीयांच्या बाबतीत शासन उदासीन आहे. कितीही मागण्या केल्या तरी मागासवर्गीयांसाठी आलेला निधी दिला जात नाही. अधिकारी वर्ग त्रुटी काढून निधी परत पाठवतात. बँका कर्ज देत नाहीत. रोजगारासाठी धडपडणाऱ्या सुशिक्षितांवर अन्याय होत आहे. समाजकल्याण मधील मागासवर्गीय महामंडळ नावालाच उरलेली आहेत. खासदारांकडे आलेला मागासवर्गीयांचा फंडही पडून असला, तरी खर्च केला जात नाही. आजही जातियवाद दिसून येतोय. आम्हाला न्याय मिळत नसेल तर आरपीआय गटाला आता वेगळा विचार करावा लागेल. दलित पँथरची चळवळ पुन्हा नव्याने उभी करावी लागेल असे कार्याध्यक्ष अशोक कांबळे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

### आरपीआयचा मिरज मतदार संघावर दावा..!

**रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आणि वेळोवेळी मिरज मतदार संघातील विविध प्रश्नांवर भूमिका घेत न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. मी स्वतः विधानसभेसाठी इच्छुक असून उमेदवार असल्याचे सांगत रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियासाठी मिरज मतदार संघ सोळावा अशी मागणी यावेळी कांबळे यांनी केली. तीन टर्म खाडे यांना आम्ही मदत करत असल्याचे सांगत अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव असलेल्या मतदारसंघावर आमचाही हक्क आहे. मतदार संघ आता आमच्यासाठी सोडावा ही मागणी केली.**

यावेळी बैठकीस आरपीआयचे पश्चिम महाराष्ट्र सचिव जगन्नाथ टोकळी, श्वेतपद्म कांबळे, जिल्हा नियोजन समितीचे निमंत्रित सदस्य पोपट कांबळे, मिलिंद मेटकरी, नितेश वाघमारे, प्रभाकर नाईक, डॉ.रविकुमार गवई, अरविंद कांबळे, अविनाश कांबळे, नंदू कांबळे, योगेंद्र कांबळे, संतोष जाधव, जगताप आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.